# तोरण

अंक ८५ जुलै-सप्टेंबर २०१०

संपादकीय

तुम्हांला हे माहित आहे का?
पारंपरिक शेती बियाणे जतन कार्यक्रम
अंतरातील घडामोडी
स्विस कॉलेजच्या विद्यार्थिनीच्या अभ्यास निबंधातले काही उतारे

देणगी मूल्य : रु. ५/-

**संपादकीय**

## लहान शेतकरी व पशुपालकांवर जागतिकीकरणाचा परिणाम

जागतिकीकरणाच्या लाटेमुळे पारंपरिक शेती व पशुपालन यांचा चेहरामोहराच बदलून गेला आहे. मी नुकतीच एका कॉन्फरन्समध्ये भाग घेण्याकरता युरोपला जाऊन आले. तिथे जर्मनीमध्ये असताना स्वतंत्रपणे दुधाचा व्यवसाय करणारा एक लहान पशुपालक मला भेटला. त्याच्याकडे ६०-७० दुभत्या गायी होत्या. तिथल्या स्थानिक मानाने त्याची गणना लहान पशुपालकामध्येच मोडत होती. त्याची बायको व मुलगा यांच्या मदतीने तो हे काम करत होता. हा व्यवसाय करायचा म्हणजे किती

प्रचंड कष्टाचे काम आहे ह्याची तुम्हाला कल्पना आहेच. तिथे दूध जरी यंत्राने काढले जात असले तरी त्यावेळेस कुणीतरी जनावरांबरोबर असणे, शिवाय जनावरांचे खाणेपिणे, गोठ्याची सफाई इत्यदिंसारखी अनेक कामे करावी लागतातच. या कामांकरता मजूर परवडत नाहीत. आणि सर्वात गमतीशीर गोष्ट म्हणजे की ज्या मोठ्या स्थानिक डेरीमध्ये ते दूध घालतात त्या कंपनीकडून त्यांना २० युरोसेंट म्हणजे लिटरला जेमतेम १२ रुपये इतकाच दर मिळतो. त्यांना थोडेफार अर्थसहाय्य शासनाकडून मिळते पण सर्व मिळून रोजच्या खर्चाचा ताळमेळ बसवण्याकरता फार अपुरे पडते. या सर्व कारणांमुळे लहान प्रमाणावर पशुपालन करणाऱ्या अनेक पशुपालकांना ह्या व्यवसायातून बाहेर पडावेसे वाटते. आणि महाकंपन्यांना नेमके हेच हवे आहे.

इथे भारतातही हळूहळू तसेच घडते आहे. लवकरच हा व्यवसाय फायदेशीर होत नाही म्हणून लहान प्रमाणावर दुग्ध व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांना त्यातून बाहेर पडावे लागेल अशी शक्यता दिसते. फक्त मोठ्या प्रमाणावरचा व्यवसायच टिकून राहिल. बऱ्याच अंशी कोंबडीपालनाच्या क्षेत्रात असे घडलेलेच आहे.

कॉनफरन्समध्ये मी केलेल्या सादरीकरणाचा बराचसा भाग लहान शेतकरी–पशुपालक महाकपन्यांकडून शेतीतून किंवा पशुपालनातून बाहेर फेकले जाणार नाहीत ह्याची खात्री असावी म्हणून त्यांची बाजू मांडण्याचा होता. कारण महाकंपन्यानी जर त्यांचे व्यवसाय गिळंकृत केले तर त्यांना शहरात जाऊन अकुशल कामगार म्हणून हलकी किरकोळ कामे करण्याशिवाय पर्यायच राहणार नाही.

जर्मनीतल्या पशुपालकाने मला सांगितले की महाकंपन्यांच्या दबावाला बळी पडण्याची त्याची तयारी नव्हती. त्याला योग्य किंमत मिळत नव्हती म्हणून तो व त्याच्यासारखेच इतर एकत्र आले आणि त्यांनी कंपनीला दूध द्यायचे नाकारले. त्यांनी पत्रकारांमार्फतही याबाबत वाच्यता फोडली. या सर्वांनी संघटित होऊन एक चळवळ सुरू केली व बाजारात स्वतःच विक्री करायला सुरूवात केली. त्यांच्या दुधाला त्यांनी Fair milk असे नाव दिले व त्याची किंमत योग्य ठेवली. मला भेटलेला पशुपालक त्याच्या दुभत्या गायींकरता प्रतिजैविकांचा किंवा जीनात्मक बदल केलेल्या सोयाचा किंवा इतर खाद्याचा वापर करत नाही.

जर्मनीतल्या छोट्या उत्पादकांच्या समस्या व आपल्या किंवा जगातल्या इतर भागातल्या छोट्या उत्पादकांच्या समस्या यात काहीच फरक नाही. जगाला त्यांचे उत्पादन हवे पण त्यापासून मिळणारा फायदा मात्र त्यांच्याबरोबर वाटून घेण्याची तयारी नाही.

**नित्या घोटगे**
अंतरा, संचालिका

•••

## तुम्हाला हे माहित आहे का?

**विविध प्रकारची पिके कमी पावसाच्या कोरडवाहू जमिनीत सतत यावीत या करता काही उपयुक्त व व्यावहारिक सूचना**

एक ते सव्वा मिटरच्या आकाराचे छोटे-छोटे प्लॉटस् पाडावे. पासाळ्याच्या सुरूवातीला संपूर्ण जमीन नांगरुन घ्यावी. प्रत्येक प्लॉटच्या चारी बाजूला ३-४ फूट रुंदीची पट्टी काहीही लागवड न करता आपणहून पडलेले बी व नैसर्गिकरित्या उगवण्याऱ्या वनस्पतींकरता रिकामी ठेवावी. अशा सर्व वनस्पतींना (स्थानिक तणांना) उपटून न टाकता वाढू द्यावे. ह्या वनस्पतींचा पीकांना हानी पोहोचवणाऱ्या कीटकांवर वाढण्याचे नैसर्गिक स्थान म्हणून उपयोग होतो. शिवाय अति उष्ण व थंड हवामान किंवा वाऱ्यापासून प्लॉटचे रक्षण करण्याकरताही त्यांचा उपयोग होतो. मधल्या नांगरलेल्या जागेत आलटून पालटून कापूस व तूर लावावी. दोन्हीमध्ये ६ फूट जागा ठेवावी. व अशा तऱ्हेने संपूर्ण प्लॉटमध्ये लागवड करावी. कापूस व तूर यामधल्या जागेत खालीलप्रमाणे लागवड करावी :

- कापूस व तूर यांच्यापासून दोन्हीकडून ९ इंचांच्या अंतरावर ओळीने मूगाची पेरणी करावी. (म्हणजे कापूस व तूर यांच्या प्रत्येक पेरणीच्या दोन्ही बाजूला मूग पेरलेले असतील).
- मूगाच्या प्रत्येक ओळीपासून ९ इंचांवर एक ओळ बाजरी पेरावी.
- बाजरीच्या प्रत्येक ओळीपासून ९ इंचांवर एक ओळ गवार पेरावी.
- गवारीच्या प्रत्येक ओळीपासून ९ इंचांवर एक ओळ ज्वारी पेरावी

वरील पिकांची बियाणे व अर्थातच नांगरणी, पेरणी, पीक कापणी व मल्चिंग या शेतकऱ्याला घ्याव्या लागलेल्या श्रमांव्यतिरिक्त दुसरे काही करावे लागत नाही – पाणी घालणे, खते टाकणे, तणे उपटणे यासारखी काहीच कामे करावी लागत नाहीत. कापूस व तूर यामध्ये वर सुचवलेले ६ फूट अंतर जर जमीन सुपीक असेल तर ७-८ फूटापर्यंत वाढवावे व जमीन कमी प्रतीची असेल तर ५ फूटापर्यंत कमी करावे. त्याचप्रमाणे सुपीक जमिनीत बी कमी पेरावे व कमी प्रतीच्या जमिनीत बी जास्त पेरावे. हे करण्यामागचे तत्व अगदी साधे आहे. जास्तीत जास्त जमीन लवकरात लवकर वनस्पतीखाली झाकून टाकावी.

(**भरत मनसाटा** यांच्या The Vision of Natural Farming, Earthcare books, Kolkata, 2010 भरत सावे यांनी दिलेल्या माहितीवरून)

• • •

## पारंपरिक शेती बियाणे जतन कार्यक्रम

सध्या आधुनिक पध्दतीने शेती करुन त्याकडे केवळ पैसे कमावण्याचे साधन म्हणून लोक पाहू लागले आहेत.त्यामुळे पारंपरिक शेती करण्याकडे लोकांचा कल कमी होऊ लागला आहे.भरपूर पैसे कमावण्यासाठी शेतकरी अपारंपरिक शेतीकडे वळू लागले आहेत. त्यासाठी जट्रोफा, निलगिरी, अकेशिया यासारख्या वनस्पतींची लागवड करु लागले आहेत. त्याचप्रमाणे आंबा, काजू यासारख्या नगदी पिकांकडे आकर्षित होऊ लागले आहेत. परंतु रोजच्या अन्नासाठी लागणाऱ्या पिकांकडे शेतकरी दुर्लक्ष करु लागले आहेत. त्यामुळे पिकाखालची जमीन कमी होऊ

लागली आणि आहे त्या शेतीत भरपूर उत्पन्न घेण्यासाठी प्रमाणापेक्षा जास्त रासायनिक खतांचा वापर करु लागले. शेतीकरता हायब्रीड (संकरित) बियाणी वापरू लागले. ह्या सर्वां करता सरकार अनुदान देते, बँका कर्ज देतात परंतु पारंपरिक शेतीसाठी सरकार अनुदान देत नाही. त्यामुळे पारंपरिक बियाणी वापरण्याकडे शेतकरी दुर्लक्ष करू लागले.

कोकणात काही शेतकऱ्यांनी भाताची संकरित बियाणी वापरली,उत्पन्न वाढले परंतु संकरित बियाणी दरवर्षी नवीन घ्यायची असतात ही माहिती न मिळाल्यामुळे त्या शेतकऱ्यांनी पुन्हा जुने बियाणे वापरले व उत्पन्न घटले. संकरित बियाणी दरवर्षी नव्याने खरेदी करावी लागतात. बियाणांसाठी दुकानात बियाणी येण्याची वाट पहावी लागते. कधी खधी बियाणांचा दर्जा कमी प्रतीचा असतो त्यामुळे उत्पन्न कमी होते. स्थानिक पारंपरिक बियाणी वर्षानुवर्षे टिकून राहतात तसेच स्थानिक बियांणाची रोगप्रतिकारशक्तिही चांगली असते.

स्थानिक पारंपरिक बियाणांपेक्षा हायब्रीड किंवा संकरित बियाणी अधिक उत्पन्न देतात असा कंपन्यांनी प्रसार केला व सुरूवातीला बियाणांचे फुकट वाटप केले, त्यांच्या किमती कमी ठेवल्या. त्यामुळे शेतकऱ्यांनी ती बियाणी



पोळे

शेतात वापरली. साहजिकच स्थानिक पारंपरिक बियाणांचा वापर कमी तर झालाच पण काहीतर कायमची नष्ट झाली. पारंपरिक शेती बियाणांची जर चारसूत्री पध्दतीने व मिश्र पध्दतीने लागवड केली (उदा. नाचणीच्या शेतात कुळीथ, तूर, तिळ्या, बावच्या, झेंडू) तर उत्पन्न वाढते.जमिनीत शेणखत, चुलीतली राख, माशाची कुट्टी, कोंबड्यांची विष्ठा, गांडुळ खत, कंपोस्ट खत यांचा वापर केला तर उत्पन्नात आणखी भर पडते.

मिश्र शेती कमी झाल्यामुळे व स्वतःसाठी शेती न करता नगदी पिकांकडे व बाजारातल्या मागणीप्रमाणे शेती करण्याकडे शेतकऱ्याचा कल वाढल्यामुळे, पारंपरिक बियाणी टिकवून ठेवण्याकरता डॉ. नित्या घोटगे, संचालिका, अंतरा संस्था, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नागिरी तालुक्यातल्या तरवळ या गावी पारंपरिक बियाणांची जपणूक करण्याच्या दृष्टीने २००७ साली एक स्थानिक पारंपरिक शेती बियाणी बँक सुरू केली आहे. पूर्वी एकाच शेतकऱ्याकडे अनेक प्रकारची बियाणी असायची पण आता ती तशी मिळत नाहीत. म्हणून प्रथम एकूण १० स्थानिक शेतकऱ्यांचा एक गट स्थापन केला. ह्या गटांमध्ये महिला शेतकऱ्यांचाही समावेश आहे कारण महिला शेतीची अनेक कामे करतात. या शेतकरी गटांमार्फत शेतीची पारंपरिक बियाणांची साठवण करण्यास सुरूवात केली आहे.

### बियाणे बँकेचे काम

शेतकऱ्यांना लागणाऱ्या बिया बियाणे बँकमधून दिली जातात. आणि त्याच्या दुप्पट बिया परत जमा केल्या जातात. स्थानिक बियाणी जतन केली जावीत हा मुख्य उद्देश आहे. म्हणून गावपातळीवर हा प्रयत्न सुरू केला आहे.

**अंतराच्या बियाणी बँकेमध्ये खालील बियाणी उपलब्ध आहेत.**

### धान्ये

भात – टायचुन, पटनी, सर्व्हेटी, काळुबाई, गुणाजी, जया, तांबसाल

नाचणी – लोटांगण, कानपेरी, मुडगी, हलवं वरई, हरिक, घोटी

### कडधान्ये

चवळी – आळसुंदा
उडीद – हिरवे, काळे
मटकी, कुळीथ, तूर, वाल

### तेलबिया

तीळ – काळे तीळ
तीळ्या,

### भाजी

काकडी, बावची/गवार, पालेभाजी, पडवळ, कारले, दोडका, वाली, वांगी, मिरची, घेवडा, दूधी भोपळा, तांबडा भोपळा, तोंडली, आंबाडी

### फळे

कारिंदा, कोहळा, चिबुड, कंदमुळे, घोरक्यान, नागर, काटेकलग, हळद, सुरण

### फुले

झेंडू – मखमल, कोंबडा

**बियाणी बँकेकडून प्रत्यक्ष वाटप केलेली बियाणे व जमा झालेली बियाणे**

**अरुणा सुरेश कुलये**

| | वाटप केलेली बियाणे | परत आलेली बियाणे |
|---|---|---|
| चवळी | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |
| वाली | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |
| तीळ्या | २५ ग्रॅम | ५० ग्रॅम |
| तीळ | २०० ग्रॅम | २०० ग्रॅम |
| काकडी | २५ ग्रॅम | ५० ग्रॅम |
| सर्व्हेटी भात | ५०० ग्रॅम | १ किलो |

**सुजाता दीपक गोरिवले**

| | | |
|---|---|---|
| कारले | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |
| अळसुंदा | १०० ग्रॅम | २०० ग्रॅम |
| पडवळ | २५ ग्रॅम | ५० ग्रॅम |
| दोडका | २५ ग्रॅम | ५० ग्रॅम |
| वाली | २५ ग्रॅम | ५० ग्रॅम |
| मिरची | १०० ग्रॅम | २०० ग्रॅम |
| तीळ्या | १०० ग्रॅम | २०० ग्रॅम |
| वांगी | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |
| टायचुन भात | १ किलो | २ किलो |
| वरई | १०० ग्रॅम | २०० ग्रॅम |
| काळे उडीद | २५० ग्रॅम | ५०० ग्रॅम |

**शिल्पा प्रकाश गोरिवले**

| | | |
|---|---|---|
| चवळी | १०० ग्रॅम | २०० ग्रॅम |
| लोटांगण नाचणी | ५०० ग्रॅम | १ किलो |
| वांगी | २५ ग्रॅम | ५० ग्रॅम |
| वाली | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |
| मिरची | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |
| तीळ्या | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |

**नंदकुमार कुलये**

| | | |
|---|---|---|
| वाली | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |
| मटकी | १० ग्रॅम | २० ग्रॅम |

**रघुनाथ सुवरे**

| | | |
|---|---|---|
| गुणाजी भात | १ किलो | २ किलो |
| पालेभाजी | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |

**चंद्रभागा कुलये**

| | | |
|---|---|---|
| घोटी | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |

| | | |
|---|---|---|
| हरिक | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |
| काळुबाई भात | १ किलो | २ किलो |
| तीळ्या | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |
| मिरची | २५ ग्रॅम | ५० ग्रॅम |
| मटकी | १० ग्रॅम | २० ग्रॅम |
| दोडका | २० ग्रॅम | ४० ग्रॅम |
| काकडी | २५ ग्रॅम | ५० ग्रॅम |
| जया भात | १.५ किलो | ३ किलो |
| उडीद काळे | २५ ग्रॅम | ५० ग्रॅम |
| चिबुड | २० ग्रॅम | ४० ग्रॅम |
| वाली | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |

**प्रमिला कुलये**

| | | |
|---|---|---|
| जया भात | २ किलो | ४ किलो |
| लोटांगण नाचणी | १ किलो | २ किलो |
| दोडका | २५ ग्रॅम | ५० ग्रॅम |
| चवळी | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |
| वाली | २५ ग्रॅम | ५० ग्रॅम |
| पालेभाजी | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |
| उडीद | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |
| तीळ | १०० ग्रॅम | २०० ग्रॅम |
| तीळ्या | २५ ग्रॅम | ५० ग्रॅम |
| कारले | २० ग्रॅम | ४० ग्रॅम |
| घेवडा | २० ग्रॅम | ४० ग्रॅम |
| चिबुड | ५० ग्रॅम | १०० ग्रॅम |
| काकडी | २५ ग्रॅम | ५० ग्रॅम |

## बियांणांची साठवणूक

बियाणी साठवण्याकरता पारंपरिक पध्दतीचा वापर केला जातो.

## बियाणे साठवण्याकरता साहित्य

| | |
|---|---|
| पेंढ्याचे पोळे | मातीचे मडके |
| बांबूची टोपली | बांबूची रोवळी |
| लाकडी पेटी | गाठोड |
| | (चुलीवर बांधून ठेवतात) |

बियाणांमध्ये चिरफळाची किंवा गेळाची फळे, निरगुडी किंवा कडुनिंबाचा पाला, चुलीतली राख, इत्यादीचा कीडनियंत्रक म्हणून वापर करतात.

## बियाणे टिकवण्याची पारंपरिक पध्दत

* कडधान्य राखेत मिसळून ठेवावी.
* भाजीच्या बियाणाचे कापडात गाठोडे बांधून चुलीच्या वरच्या बाजूला घरात टांगून ठेवावे.
* काकडी, चिबुड, भोपळा, कोहळा यांच्या ताज्या बिया घराच्या भिंतीला चिकटवून ठेवाव्या.
* हळद शेणकोळ्यामध्ये कालवून ठेवावी.
* वाल मातीत भिजवून सुकवून ठेवावे.
* कंदमुळे नाचणीच्या भुश्यामध्ये ठेवावी.

## शेतातून बियाणे काढताना घ्यावयाची काळजी

* एकाच प्रकारचे उत्कृष्ट बियाणे निवडून वेगळे ठेवावे
* नंतर उन्हात व्यवस्थित सुकवावे
* बियाणांची साल काढू नये
* पारंपरिक शेती बियाणी बँकेने बियाणी साठवणूक करण्याचे काम सुरू केल्यापासून शेतकऱ्यांना वेळेवर व चांगल्या प्रतीची बियाणी मिळू लागली आहेत.

**राजन कुलये**
**स्मिता कुलये**

•••

## अंतरातील घडामोडी

१. ९ जुलै २०१० : ॲनी क्रिस्तीनेट या स्विस कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चरमधून अंतरामध्ये अभ्यास करण्याकरता आलेल्या विद्यार्थिनीचे तडवळे येथील मेंढपालक व महिलांसमोर पशुपालनात वापरण्यात येणाऱ्या वनस्पती औषधी व उपचार ह्या तिने अभ्यासलेल्या विषयावर आधारित माहितीचे सादरीकरण

२. अंतराने जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१० मध्ये आयोजित केलेल्या पशुदूत कार्यक्रमातल्या तीन कार्यक्रमांमध्ये सातारा, कोल्हापूर, सोलापूर , अहमदनगर, पुणे जिल्ह्यातून आलेल्या मेंढपाळांचा चांगला सहभाग.

३. २७–३० जुलै दरम्यान सहजीवन संस्था, भुज, गुजरात येथून आलेल्या २ पशुवैद्यक व ४ पशु स्वास्थ्य कार्यकर्त्यांना प्रशिक्षकांचे प्रशिक्षण या सदराखाली पशुपालन व वनस्पती औषधी यासंबंधीचे प्रशिक्षण

४. १–२ जुलै रोजी पुण्यात झालेल्या National Workshop on Climate Change Actions in Semi-arid Areas: Linking Grassroot Experiences and Perspectives to Policies and Programmes या कार्यशाळेत डॉ. नित्या घोटगे यांचा सहभाग

५. १६–१९ दरम्यान अंतरातर्फे पशुपालनातील औषधी वनस्पतींचे स्थान व उपयोग या विषयावर क्रपाविस, अलवर, राजस्थान या संस्थेच्या कार्यकर्त्यांना डॉ. सचिन व सन्यासी राव यांचा प्रशिक्षण कार्यक्रम

६. अंतरा, CeNSE व FES या संस्थांनी ३–४ सप्टेंबर २०१० रोजी आयोजित केलेल्या Common Property Resources and Pastoral Production Systems in Transition : from Conflict to Convergence या विषयावरच्या कार्यशाळेला जयपूर, बंगलोर, गुजरात, चेन्नई, महाराष्ट्र व आंध्र प्रदेशातल्या विविध जिल्ह्यातून आलेल्या मेंढपाळांचा उत्तम प्रतिसाद

७. २० ते २५ सप्टेंबर दरम्यान हैद्राबाद येथे संपन्न People Led Development झालेल्या संबंधीच्या मिटींगमध्ये अंतरा, पुणे इथल्या डॉ. सचिन हगवणे, स्मिता कुलये, संगीता खापरे तसेच विविध जिल्ह्यातून आलेले मेंढपाळ, शेतकरी, आदिवासी व अफगानिस्तानातून आलेले काही शेतकरी यांचा सहभाग व देवाण–घेवाण

•••

## ॲनी क्रिस्तीनेट या स्विस कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चरमधून आलेल्या विद्यार्थिनीच्या अभ्यास निबंधातले काही उतारे

अंतरा ज्या महाराष्ट्रातल्या तीन जिल्ह्यांमध्ये, म्हणजे सातारा. सोलापूर व कोल्हापूर येथे १–४ वर्षे काम करत आहे आणि २०१० पासून अहम दनगर हे मेढपालकांबरोबरच्या ह्या संशोधनाचे कार्यक्षेत्र आहे. एकूण १५९ मेंढपालकांची मुलाखत घेतली. विश्लेषण करण्याकरता व अंतराने नेमून दिलेले लक्ष गाठण्याकरता ही माहिती पुरेशी होती. पुरूष व महिला दोघांचाही माहिती देण्यामध्ये सहभाग होता. या मागे, पुरूषांच्या व महिलांच्या माहितीमध्ये दोन वेगळे दृष्टीकोन असण्याची शक्यता आहे ही धारणा होती. माहिती गोळा करण्याची प्रक्रिया बराच वेळ लागणारी होती व त्यात अनेक लोकांचा सहभाग होता. अंतरातील पशुवैद्यक, पशुआरोग्य कार्यकर्ते यांनी ते काम करत असलेल्या क्षेत्रातून

माहिती गोळा करायला मदत केली. जिथे जिथे शक्य आहे तिथे महिलांचा सहभाग असावा याकडे विशेष लक्ष दिले. अर्थात, त्यांच्या कामाच्या वेळामुळे व स्थलांतरामुळे महिलांची संख्या पुरूषांच्यापेक्षा कमी आहे.

मेंढीपालक आजही पूर्वीच्या पिढ्यांकडून चालत आलेल्या पारंपरिक ज्ञानानुसार मेंढ्यांच्या आजारासंबंधातल्या काही प्रथा अजूनही पाळतात. विशेषतः, पोटफुगी, मावा व दगडी रोगांकरता बरेच वेळा अजूनही पारंपरिक उपचारपध्दती अवलंबली जाते. अर्थात हव्या त्या वनस्पती उपलब्ध नसणे, वनस्पती गोळा करून औषध बनवण्याकरता लागणाऱ्या वेळेचा अभाव अशा काही अडचणी असतात. वनस्पती औषधींची आणखी एक प्रमुख मर्यादा म्हणजे, संसर्गजन्य रोग प्राथमिक अवस्थेपलिकडे गेल्यानंतर ह्या औषधींचा काही उपयोग होत नाही. या वनस्पती औषधींची जमेची बाजू म्हणजे त्या खर्चिक नसतात व त्यांचे काही दुष्परिणाम होत नाहीत. शिवाय त्यांनी स्वतःच या उपचारांचा अनुभव घेतलेला असल्यामुळे, ते परिणामकारक असतात यावर मेंढपालकांचा विश्वास आहे. इथे मुद्दाम सांगावेसे वाटते की अंतराने तयार केलेल्या पोटफुगी व जुलाबाकरता तयार केलेल्या पावडरी ज्यांनी ज्यांनी वापरल्या आहेत त्यांनी त्या खूप उपयोगी आहेत असे सांगितले. परंतु, वेळेचा अभाव व मेंढ्या वळण्याकरता मनुष्यबळ कमी या दोन कारणांमुळे इच्छा असूनही वनस्पती औषध तयार करण्याकरता वेळ मिळत नाही. त्यामुळे स्वतः वनस्पती औषधी तयार करण्याऐवजी, अंतराने ज्यांचा प्रयोग करून यशस्वीपणा तपासून पाहिलेला आहे अशी अंतराची तयार स्वरुपातली औषधे हा एक पर्याय होऊ शकेल.

•••



बुक-पोस्ट

प्रति,

**अंतरा**
एफ, लॅंटाना गार्डन्स, एन.डी.ए. रस्ता,
बावधन, पुणे ४११ ०२१, महाराष्ट्र
दूरध्वनी : (२०) २२९५३५४६, २२९५३५४७
ईमेल : anthra.pune@gmail.com
वेबसाईट : www.anthra.org

## खंडाळा घाटाचा शोध

धनगर समाजातही संत कनकदास, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, शिंगरोबा यांच्यासारख्या काही थोर व्यक्ति होऊन गेल्या. त्यापैकी शिंगरोबानी खंडाळा घाटाचा शोध लावला. त्याची हकिकत अशी आहे. बिरोबा व खंडोबा ही धनगरांची दैवते. बिरोबानी मेंढ्यांचा सांभाळ करण्याकरता त्यांना हाटकर धनगरांच्या हवाली केले ही कथा सर्वांना माहित आहे. देवाने त्यांना एक शपथ घातली. घनगर ज्या मेंढीचा शेंबूड पुसेल, तिची निगा राखेल, तिला व्यवस्थित चारेल ती मेंढी त्या धनगरावर संकट आले तर ते दूर करेल. आणखी त्यांना देवाने असेही सांगितले की, 'मेंढीला उपाशी मारु नका, तुम्ही जर मेंढ्यांना जीव लावला तर तुम्ही कधीच उपाशी मरणार नाही. ही तुमची लक्ष्मी आहे.'

बिरोबा देवाने जिथे जिथे मेंढ्या चारल्या तिथे तिथे दगड म्हणजे लिंग ठेवले व त्या ठिकाणी आज धनगरांनी देवळे बांधली आहेत. धनगरांना असे वाटले की आपला देव जर मेंढ्यांना फिरवत होता तर आपणही त्यांना फिरवले पाहिजे. मग धनगर ह्या गावाहून त्या गावात जायला लागला व शेतकऱ्यांच्या शेतात मेंढ्या बसवू लागला. मोबदल्यात शेतकरी त्याला धान्य देत असे. असेच एकदा शहाजीराजे, जिजाबाई व मावळे नाणे घाटातून आले होते हे फक्त धनगरांना माहित होते. म्हणून धनगरांनी त्या घाटावर जाऊन पाहणी केली तेव्हा त्यांना खाली खूप जंगल दिसले. इकडे खूप चारा मिळेल म्हणून धनगराने त्या घाटातून जायला सुरूवात केली. घाट खूप उतरणीचा असल्यामुळे, बरोबरची घोड्यावर बसलेली मुले व म्हातारी माणसे घोड्याच्या मानेवर घसरून खाली पडत असत. फक्त मेंढ्या व पायी चालणारे इथून जात असत पण बऱ्याच मेंढ्याही पाय घसरुन मरत असत. म्हणून धनगरांनी हा घाट बंद केला. शिंगरोबा नावाच्या धनगराने खंडाळा घाटाचा शोध लावला. खंडाळ्याचा घाट वळणाचा असल्यामुळे धनगरांना सहज चढता उतरता येत असे. हे इंग्रजांना माहित झाले. त्यांना पुणे–मुंबई जोडणारा जवळचा रस्ता हवा होता. त्यांनी दुभाष्याच्या मदतीने शिंगरोबाला जवळचा रस्ता कोणता असे विचारले. शिंगरोबाच्या हातात कुऱ्हाड व बरोबर ४ कुत्रे, ४ घोडे, ५० मेंढ्या, २० शेळ्या होत्या. खंडाळा घाटाचा शोध घेताना कुत्रे पुढे चालत असत, त्यांच्या पाठीमागे शिंगरोबा, मग मेंढ्या व घोडे. इंग्रज त्याच्या पाठोपाठ गेले. त्यांच्या लक्षात आले की हा रस्ता काढण्यास योग्य आहे. ह्या रस्त्याचा शोध लावल्याबद्दल शिंगरोबाचे नाव होईल असे इंग्रजांना वाटल्यामुळे त्यांनी त्याला गोळी घालून ठार मारून टाकले व त्याला त्याच जागेवर पुरले. पण पुढे असे व्हायला लागले की इंग्रजांनी कामाला सुरूवात केली पण वळणावर त्यांची गाडी आली की ती उलटायची. मग इंग्रजांच्या लक्षात आले की आपण इथे एक छोटेसे देऊळ बांधावे. येता जाता ते तिथे नारळ फोडत असत. आजही तिथून प्रवास करणारे दर्शन घेतात.

**महेन्द्र सिदु खताळ**
ढवळपुरी, ता. पारनेर, जि. अहमदनगर

•••

# ॲनी क्रिस्तीनेट या स्विस कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चरमधून आलेल्या विद्यार्थिनीच्या अभ्यास निबंधातले काही उतारे

## ॲनी क्रिस्तीनेट या स्विस कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चरमधून आलेल्या विद्यार्थिनीच्या अभ्यास निबंधातले काही उतारे

अंतरा ज्या महाराष्ट्रातल्या तीन जिल्ह्यांमध्ये, म्हणजे सातारा. सोलापूर व कोल्हापूर येथे १–४ वर्षे काम करत आहे आणि २०१० पासून अहमदनगर हे मेढपालकांबरोबरच्या ह्या संशोधनाचे कार्यक्षेत्र आहे. एकूण १५९ मेंढपालकांची मुलाखत घेतली. विश्लेषण करण्याकरता व अंतराने नेमून दिलेले लक्ष गाठण्याकरता ही माहिती पुरेशी होती. पुरूष व महिला दोघांचाही माहिती देण्यामध्ये सहभाग होता. या मागे, पुरूषांच्या व महिलांच्या माहितीमध्ये दोन वेगळे दृष्टीकोन असण्याची शक्यता आहे ही धारणा होती. माहिती गोळा करण्याची प्रक्रिया बरीच वेळ लागणारी होती व त्यात अनेक लोकांचा सहभाग होता. अंतरातील पशुवैद्यक, पशुआरोग्य कार्यकर्ते यांनी ते काम करत असलेल्या क्षेत्रातून माहिती गोळा करायला मदत केली. जिथे जिथे शक्य आहे तिथे महिलांचा सहभाग असावा याकडे विशेष लक्ष दिले. अर्थात, त्याच्या कामाच्या वेळामुळे व स्थलातरामुळे महिलांची संख्या पुरूषांच्यापेक्षा कमी आहे.

मेंढीपालक आजही पूर्वीच्या पिढ्यांकडून चालत आलेल्या पारंपरिक ज्ञानानुसार मेंढ्यांच्या आजारासंबंधातल्या काही प्रथा अजूनही पाळतात. विशेषतः, पोटफुगी, मावा व दगडी रोगांकरता बरेच वेळा अजूनही पारंपरिक उपचारपध्दती अवलंबली जाते. अर्थात हव्या त्या वनस्पती उपलब्ध नसणे, वनस्पती गोळा करून औषध बनवण्याकरता लागणाऱ्या वेळेचा अभाव अशा काही अडचणी असतात. वनस्पती औषधींची आणखी एक प्रमुख मर्यादा म्हणजे, संसर्गजन्य रोग प्राथमिक अवस्थेपलिकडे

गेल्यानंतर ह्या औषधींचा काही उपयोग होत नाही. या वनस्पती औषधींची जमेची बाजू म्हणजे त्या खर्चिक नसतात व त्यांचे काही दुष्परिणाम होत नाहीत. शिवाय त्यांनी स्वतःच या उपचारांचा अनुभव घेतलेला असल्यामुळे, ते परिणामकारक असतात यावर मेंढपालकांचा विश्वास आहे. इथे मुद्दाम सांगावेसे वाटते की अंतराने तयार केलेल्या पोटफुगी व जुलाबाकरता तयार केलेल्या पावडर ज्यांनी ज्यांनी वापरल्या आहेत त्यांनी त्या खूप उपयोगी आहेत असे सांगितले. परंतु, वेळेचा अभाव व मेंढ्या वळण्याकरता मनुष्यबळ कमी या दोन कारणांमुळे इच्छा असूनही वनस्पती औषध तयार करण्याकरता वेळ मिळत नाही. त्यामुळे स्वतः वनस्पती औषधी तयार करण्याऐवजी, अंतराने

# ईस्ट गोदावरी भागामध्ये अभ्यास भेटी व माहिती देवाण-घेवाण

ईस्ट गोदावरी भागामध्ये अभ्यास भेटी व माहिती देवाण-घेवाण हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात भारतातील अंतरा संस्था, गिरीजन दिपीका, यक्षी, थोल्लकरी समुदाय व अफगाणिस्थान येथील मदेरा या संस्थेशी जोडलेला जनसमुदाय या कार्यक्रमामध्ये सहभागी होता. अफगाणी शेतकऱ्यांचा, महाराष्ट्रातील तसेच आंध्रप्रदेशातील शेतकरी व पशुपालक समुदायांचा त्याचप्रमाणे वरील संस्थांचे कार्यकर्ते व व्यवस्थापनातील काही तज्ञ मंडळी यांचा देखील या प्रक्रियेत सक्रिय सहभाग होता. या कार्यक्रमांत सामाजिक व सांस्कृतिक बाबी, शेती, पशुपालन, परंपरागत पद्धती व ज्ञान इत्यादी प्रमुख विषयांशी निगडीत माहितीची देवाण-घेवाण झाली.

ईस्ट गोदावरी भागातील थोल्लकरी समुदाया बरोबर जे अनुभव व निरिक्षण या ठिकाणी आवर्जुन वर्णन करावेसे वाटते.

**थोल्लकरी व आदीवासी लोकांचा समुदाय**

या समुदायामध्ये प्रामुख्याने डोंगर उतारावर भाताची शेती करणे, जंगलातील वन उपज गोळा करणे, उदा., मध गोळा करणे, शिकार करणे ही प्रमुख उदरनिर्वाहाची माध्यमे होत. या भागामध्ये या लोकांकडे शेळ्या, देशी गायी, बैल आहेत. विशेषकरून प्रथिनांची गरज भागविण्याकरीता असतील, ज्यास 'ईंडीयन फायटर' असे संबोधले जाते असे जातीवंत पक्षी पहावयास मिळतात. प्रत्येक कुटुंबामध्ये पक्ष्यांचे प्रमाण अधिक पहावयास मिळाले. विचारपूस केली असता असे आढळून आले की, प्रत्येक वेळी प्रत्येक पिकाच्या कापणी/काढणी प्रारंभ हा कोंबडे कापून जंगल देवतेला अर्पण करून प्रसाद चढवून केला जातो. असे लोक मानतात की, ही जंगल देवता त्यांच्या पिकांचे जंगली प्राण्यांपासून, श्वापदापासून रक्षण करीत असते व त्यामुळे तिला प्रसन्न करण्याकरीता हे केले जाते. या लोकांची शेती ही डोंगरउतार व जंगलातच असल्याने हे करणे त्यांना गरजेचे आहे असे वाटते. अत्यंत साध्या पद्धतीने भात शेतीची पद्धत आहे. उतारावरचा काही भाग ते स्वच्छ करतात. तेथील तण काढून पावसापूर्वी देशी जातीचे भाताचे बी फेकून देतात. त्या नंतर त्याकडे अजिबात लक्ष दिले जात नाही. कापणी पूर्वी प्रसाद म्हणून कोंबडे देऊन कापणी केली जाते.

या भागामध्ये आणखी वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे वनराया होत. प्रत्येक वनरायीमध्ये "sacred grooves" देवी किंवा देवतांच्या मूर्तीस्वरूप दगड आहेत. त्याभोवताली खूप दाट झाडी आहे. आपणास हवे असलेल्या जळावू लाकडांव्यतिरीक्त वृक्षतोड अजिबात केली जात नाही. एखाद्याने केलीच तर त्याच्यावर त्या देवतेचा कोप होतो अशी धारणा गावातील लोकांमध्ये आहे व

(पान ७ वरून पुढे चालू...)

त्यामुळेच ही जंगले सुरक्षीत व सदाहरीत असल्याचे या ठिकाणी पहावयास मिळाले.

या भागांमध्ये स्त्रियांना प्रमुख स्थान असल्याचे निदर्शनास आले. आदीवासी महिला निर्णय घेण्याच्या बाबतीत अग्रेसर असल्याचे व समुदायाबरोबर चर्चा करताना पहावयास मिळाले.

पूर्वी या समुदायामध्ये बाहेरून व्यापारी वर्गाने चटणी व मसाल्याचे पदार्थ विक्री या माध्यमातून शिरकाव केला व या लोकांना उधार देत गेले. काही वर्षाने या व्यापाऱ्यांनी पैशांची मागणी केली. त्यावेळी या आदीवासींकडे ते पैसे नव्हते त्यामुळे त्यांनी कोऱ्या कागदावर सह्या किंवा अंगठे दिले. व्यापारीवर्गाने त्याचे रुपांतर काही बड्या व चालू लोकांना हाताशी धरून पक्क्या कागदामध्ये केले व आदिवासींच्या जमिनी स्वतःच्या नावे केल्या. हे जेव्हा आदिवासीं समुदायाच्या लक्षात आले तेव्हा ते संघटीत झाले व त्यांनी कायद्याचा आधार घेतला व एका विशिष्ट कायद्यांतर्गत आदिवासींच्या जमिनीची खरेदी विक्री करता येत नाही हे दाखवून त्यांनी व्यापाऱ्यांविरोधात दावे सादरकेले व आता त्यांना त्यांच्या जमिनी परत मिळाल्या व त्याची सरकारी कागदपत्रे (Certificates) देखील त्यांना प्राप्त झाली आहेत. अशा तऱ्हेने या समुदायाची अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याची वृत्ती प्रकर्षाने जाणवली.

•••